ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 3.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

November Special Issue - IV 2021



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Prof.Dr.Sadashiv H. Sarkate

Scanned with OKEN Scanner

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

## An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

**Editor**
**Prof. Dr. Sadashiv H. Sarkate**

**● Mailing Address ●**

**Prof. Dr. Sadashiv H. Sarkate**
Editor : POWER OF KNOWLEDGE
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

Scanned with OKEN Scanner

## Index (अनुक्रमणिका)


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Financial Literacyand Digital Payment System In India | Dr. MaindBalasahebVaijanath | 1-7 |
| 2 | Impact of Globalization on English Language | Dr. Subhash S. Waghmare | 8-12 |
| 3 | A Great Never Give Up Personality Artist P.N.Choyal | Jyoti Singh | 13-17 |
| 4 | Public Libraries of Tarakeswar Block in the Hooghly District of West Bengal: Present-day Scenario | Bikash Kumar Halder<br>Bibhash Ram Singha | 18-24 |
| 5 | Geographical study of green agriculture | Dr.Ghodke.J.V. | 25-27 |
| 6 | Need to Know Malnutrition | Dr. Manisha Pandurang Wanjari | 28-31 |
| 7 | Adolescent Reproductive and Sexual Health (ARSH) services in Gadchiroli- A rapid analysis | Mayank Mohan Mishra | 32-35 |
| 8 | A Study Of The Impact Of Digital Marketing In Sustaibale Development Of India | Mrs. Prof. Pratibha Dattatrya Pudale | 36-40 |
| 9 | Imperical Study Of Relationship Between Occupation Stress And Emotional Intelligence During Covid -19 | Dr. Anita Manna<br>Bipinchandra S. Wadekar. | 41-46 |
| 10 | Transfer: Effective Tool For Accountable Administration | Dr. More Navanath Bhagawan | 47-51 |
| 11 | मराठी साहित्यातील गझलेचा उगम व स्वरुप | शीतल अण्णासाहेब सुसरे | 52-55 |
| 12 | भारतीय महिलांवरील अत्याचार - एक सामाजिक चिंतन | प्रा.कोने दिलीप महादू | 56-61 |
| 13 | रानवाटा' कविता संग्रहातील आदिवासींच्या प्रश्नांचे दर्शन | डॉ.किशोर नथू सोनवणे<br>डॉ.मधुचंद्र लक्ष्मण भुसारे | 62-67 |
| 14 | गुरुसंस्था : प्राचीन व मध्ययुगीन संदर्भ | प्रा.डॉ.दत्तात्रय प्र. डुंबरे | 68-74 |
| 15 | महात्मा फुले आणि भारतीय शिक्षण | डॉ.राजेश्वर दुडूकनाळे | 75-80 |
| 16 | चरित्र - आत्मचरित्र : स्वरुप व संकल्पना | प्रा.डॉ.राहुल हांडे<br>श्री.रविंद्र मधुकर चव्हाण | 81-84 |
| 17 | मुस्लीम लेखिकांच्या आत्मचरित्रातुन आलेले भाषाविशेष | प्रा.डॉ.केतकी प्र.भोसले | 85-88 |
| 18 | फकिरा : आशय आणि अभिव्यक्ती | डॉ.राजेश्वर मा. दुडुकनाळे | 89-92 |
| 19 | शाहीर साहेबराव येरेकराच्या शाहिरीतून प्रकटणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकराविषयीची कृतज्ञता | चारुमती नारायण भदरगे | 93-97 |
| 20 | डॉ. जयंत नारळीकरांचे विज्ञान साहित्यातील योगदान | डॉ. दिलीप पवार<br>डॉ. संजय शिंदे | 98-102 |


Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | डॉ.विनोद गायकवाड यांच्या साई आणि युगांत या कादंबरीचा एक विचार | डॉ.यशवंत राऊत<br>श्री.अमर विलास कांबळे | 103-105 |
| 22 | ओवीगीतातून दिसणारे स्त्रीदर्शन | डॉ.प्रोफेसर सिनगारे पी.आय. | 106-108 |
| 23 | आदिवासी लोकगीतांची परंपरा | डॉ.दिलीप पुंडलिक पवार<br>प्रा.विकास नामदेवराव बागलावे | 109-111 |
| 24 | कौटुंबिक हिंसाचाराचा भारतीय समाजावर पडलेला प्रभाव | प्रा.डॉ.रुपराव उ. गायकवाड | 112-115 |
| 25 | छत्रपती राजश्री शाहू महाराज यांचे शैक्षणिक योगदान | दयानंद मनोहरराव राठोड | 116-119 |
| 26 | कोरोना महामारी (कोविड –१९) : सामाजिक व मानसिक आरोग्यावर परिणाम | प्रा. डॉ. विलास घोडे | 120-125 |
| 27 | धुळे जिल्ह्यातील भिल्ल आदिवासी विकासापासून वंचितच | श्री.नितीन मांगुलाल महाल | 126-134 |
| 28 | पायाभूत सुविधांमधील पाणी या नैसर्गिक साधनसंपत्तीचे व्यवस्थापन ही काळाजी गरज | पाटील स्वाती विजय | 135-141 |
| 29 | विद्यार्थीः वाचन संस्कृती | डॉ. किरण जगदाळे | 142-145 |


Scanned with OKEN Scanner

# आदिवासी लोकगीतांची परंपरा

**डॉ.दिलीप पुंडलिक पवार**
मार्गदर्शक
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदगाव जि.नाशिक

**प्रा.विकास नामदेवराव बागलावे**
संशोधक
के.टी.एच.एम.महाविद्यालय, नाशिक

आदिवासींच्या लोकगीतांचा जन्म हा वेदपूर्व काळात झाल्याचे मानण्यात येते. या अर्थाने मग लोकगीतांच्या धरतीवर वेदांची निर्मिती झालेली आहे असे म्हणावे लागेल. परंतु वेदाप्रमाणे आदिवासींच्या धार्मिक व देव-देवताविषयक, निसर्गविषयक गीतांचे लेखन झाले नाही हे खरे असले तरी आजही आदिवासींचे देवताविषयक असो की अन्य प्रकारची गीते त्यांनी मौखिक रूपाने जतन करून परंपरेने चालत आलेला लोकगंगेचा नितळ आणि निखळ असा प्रवाह आजही अबाधित राखण्याचा प्रयत्न आदिमानी आपापल्यापरीने केलेला आहे.

आपण माणसांची जितकी प्रथमवस्था जाणून घेण्याचा प्रयत्न करू तितकी त्यांच्यात जास्तीत जास्त पूर्व संस्कृती असल्याचे दिसून येते. म्हणूनच खेडयापेक्षाही दुर्गम अशा डोंगरदऱ्यात राहणाऱ्या आदिवासींच्या लोकसाहित्याचा अभ्यास करीत असताना असे लक्षात येते की त्यांच्या जीवनात परंपरागत स्वरूपाचे लोकगीते ,लोककथा, उखाणे ,म्हणी यांना अत्यंत महत्त्व आहे. यातही लोकगीतासारख्या वांग्मय प्रकाराने आदिवासींचे जीवन व्यापून राहिले आहे. शिकारीचा प्रसंग असो की शेतीचे कोणतेही काम असो की धार्मिक विधी असो अथवा सामूहिकरित्या पार पाडला जाणारा प्रसंग असो तिचे लोकसाहित्य हे असणारच. उदाहरणार्थ गोंड जमातीमध्ये विविध विधी होतात. त्यातील विवाह हा विधी जेव्हा होतो. त्यावेळी बरीच गाणी म्हटली जातात लग्न लागण्यापुर्वी वधूच्या घरी. वराच्या घरी लग्न ठरवल्यावर खूप गाणी म्हणताना दिसतात. त्यातलाच वधूच्या घरी होणारा एक विधि पुढीलप्रमाणे.

"घडी ते कोसर घडी
चिमटीने लावे लाडा साडी
घडी चढवायाना वो चढवायला
नवरीच्या माया बहिणी घडी चढवा या नर
रेला रेला रे रे ला
बाबा इंदर घडी जो लाडा
बाबा इंदर घडी जो
मामा इंदर घडी लो लाडा"

लग्नप्रसंगी जे कपडे वधू.वरास घालवायचे असतात. त्या कपड्याची घडी खांद्यावर ठेवली जाते हा प्रसंग फारच हृदयद्रावक असा असतो.

लोकगीतांची ही प्राचीन परंपरा मानवी समाज समूहाने, टोळीने राहू लागला तेव्हापासूनची असावी. "आर्य आगमन के पूर्व बहुतही समृद्ध आर्येत्तर सभ्यता भारत वर्ष में फैली हुई थी। आर्योने राजनीतिक रूप में तो भारत वर्ष को जीत लिया था। पर वह सांस्कृतिक रूप में पूर्ण रूप से यही के मूल निवासियों के द्वारा प्रभावित हो गए थे। यहां की मुल सभ्यता , वैदिक सभ्यता हमारे ग्रामगीत में अब भी 'श्रुति' ही है। जिस प्रकार वेदोंद्वारा आर्य सभ्यता का ज्ञान हो सकता है , उसी ग्रामगीतोंद्वारा आर्यपूर्व सभ्यता का अध्ययन हो सकता है।"

वेदपूर्व काळात समाजजीवनात लोकगीते प्रचलित होती याचा उल्लेख वेद, पुराने, ब्राह्मण ग्रंथ, बौद्ध, जैन वांग्मयात येतो. यावरून असे ठरविता येते की लोकगीते ही वेदपूर्व काळापासून प्रचलित आहे.

वेदपूर्व आदिम काळात ' शामन' या कलाकाराचा तसेच समूह प्रमुखाचा उल्लेख आढळतो. हा 'शामन' विशिष्ट लोकसमूहाचा मुखिया मानला जात असे. आपले कर्तव्य म्हणून ते आपल्या समूहाला, टोळीला ;निसर्गपूजा, पशुपक्षीपूजा, जीवितरक्षण या विषयी मार्गदर्शन करीत ; हे त्यांचे मार्गदर्शन मौखिक गीतातून चालत असे.

आजही आदिवासींमध्ये 'भगत', 'देहारी' किंवा 'गावचा मोरक्या' याला सगळा गाव मानतो. अनेक विधींचे पूजन ,मंत्रोच्चार म्हणण्यासाठी त्याला बोलवतात. .किंबहुना काही आदिम



Scanned with OKEN Scanner

जमातीत सुधारकासारखे लोक आहेत. त्या त्या जमातीतील स्त्री. पुरुषाला कानमंत्र गीताद्वारे ते देत असतात .ते असे म्हणतात,

" रेलो रेलो रे रेलो रेलो रे रे रे
लेकीमाके झोप बगे लागला ,आदिवासीगती आयाला का
पहिले दो रे आदिवासी ईमा धनुर्धारी, जुलेला इतिहास नावाभारी
उघडे गिमे इके इगा वरी, निके बतीता झोप वाया लागेता ,
खालीमिके तारीले, खालीमिके मुंजाला होलमीये पीमोर निदास,
खालीमिके झोपडी मंदाले ,बहूनेका झोप लागली लाथा,
आदिवासी जनजाता मंदाफूट पाटे निलेमाशी कीमउंदी ऊते,
भारत माजाना शेषापीकाटे"

आपल्या जमातीतील स्त्री.पुरुषांना सदन समाजापासून जागृत करण्यासाठी या जमातीतील सुधारक मंडळी प्रयत्न करीत असतात. एकप्रकारे मार्गदर्शन करीत असतात.

**मौखिक परंपरा :**

लोकगीतांचा आढळ प्रामुख्याने निरक्षरात आणि शहरी संस्कृतीपासून दूर असलेल्या ग्रामीण लोकात होतो. लोकजीवनात प्रचलित असलेली लोकगीते मौखिक परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत आणि पुन्हा पुढच्या पिढीपर्यंत आपला प्रवाह चालू ठेवतात. मौखिक परंपरेमुळे ही लोकगीतांची मूळ प्रकृती कायम राहू शकते. यामुळेच कित्येक शतकांपूर्वी लोकजीवनात प्रचलित असलेल्या लोकगीतांचा मूळ गाभा आजही लोकगीतात कायम असल्याचे प्रत्ययास येते.

कित्येक शतकांपूर्वी विधीच्या निमित्ताने, श्रमपरिहारासाठी किंवा मनोरंजनासाठी शब्दबद्ध लोकाविष्कार झाल्याचे दिसून येते. त्यातल्या काही लोकाविष्काराला लोकवांगमयाचे स्वरूप प्राप्त होते. कालांतराने हाच लोकाविष्कार लोकजीवनात प्रचलित होतो. त्यातील कथा, गीते लोकांच्या मनाला भावतात आणि लोकजीवनात लोकवांग्मयाचा हा प्रवाह मौखिक स्वरूपातून झुळ झुळ वाहत पुढे जात असतो. लोकवांगमयाच्या लोकगीतांच्या या प्रवाहात पुढे लोकजीवनातील आणखी काही ओहळ त्यात येऊन मिळतात. मूळचा प्रवाह कायम राहतोच. प्रत्येक पिढीत त्यात नवीन भर पडते, जुन्यातील काही लोप पावते, नव्या जुन्याच्या मिलाफातून लोकगीतांचा नित्यनूतन प्रवाह हा लोकजीवनात पुन्हा आपली वाटचाल पुढच्या पिढीकडे चालू ठेवतो. लोकगीतांचा हा प्रवाह केवळ मौखिक परंपरेमुळेच अखंडपणे वाहू शकला असे म्हणता येते. मौखिक परंपरा हे लोकगीताचे तसेच लोकवांगमयाचे एक महत्त्वाचे स्वरूप विशेष होय.

लोकगीताची निर्मिती प्रामुख्याने अशिक्षितामध्ये होत असल्याने लोकगीते मौखिक स्वरूपात आढळतात. लोकगीतातून कोणत्याही एका व्यक्तीचा उल्लेख होत नसल्याने ती समूहाची ठरतात. ती कोणा एकाच्या मालकीची नसून सामुहिक असल्याने त्यात सगळ्यांकडून आपापल्यापरीने परिवर्तन घडते. त्याची जडणघडण होण्यास मदत होते. या प्रक्रियेत लोकगीताचे बाह्य स्वरूप बदलून , त्याचा मूळ गाभा मात्र बदलत्या प्रवाहात ही तसाच कायम राहतो. त्यावर मुलामा चढविण्याचे काम मौखिक परंपरेतून घडत असते.

**लोकगीतांची मोठी परंपरा आणि प्रवाहीपणा :**

सुरुवातीचा ग्रामीण आणि आदिम भाग साक्षर नव्हता किंवा साक्षरतेचा गंधही त्या परिसरात वा परिस्थितीत नव्हता मग अशा निरक्षर मानवाला गीते वाचता किंवा लिहिता येणे कठीणच, तर या मंडळीत विश्वास असणाऱ्या व्यक्तींनी या गीतांचे पाठांतर करावे किंवा



Scanned with OKEN Scanner

आवडीने तो करणे ,शक्यतो स्त्रियांच्या तोंडी ही गीते मुखोद्गत असत. हा त्यांचा आवडीचा विषय असल्याने स्त्रियांना हे काम न वाटता तो छंद त्यांचा असायचा, पण या छंदामुळेच ही लोकगीते आपणा पर्यंत पोहोचू शकली आहेत असेच म्हणावे लागेल. खरेतर या अज्ञानी मानवानेच लोकगीताला जन्म दिला आहे व त्यानेच ते मुखोद्गत पाठ केले आहे. त्यामुळे या लोकांच्या जडणघडणीत कुठेच अडथळा येत नाही, तर ती स्वैरपणे गायली जातात. मात्र काळानुसार या गीतात बदल होताना दिसू लागला आहे. परिणाम हे बदलते मौखिक स्वरूप त्यांच्या बदलत्या प्रवृत्तीचा एक भाग आहे ज्याप्रमाणे नदीचे पाणी खळखळते प्रवाहात वाहते व वाहतांना चढ उताराचे संकेत देताना दिसते. तशाच स्वरूपाचे हे लोकगीत आहे. लोकगीते आपल्या प्रवाहात वाहते व त्याच्या गुणांमुळे ते बदलत्या लोकजीवनाचे संकेतच देत असते.

थोडक्यात लोकगीतांचे मौखिक स्वरूप आणि त्यांच्या ठिकाणी असलेला प्रवाहीपणा हे दोन्ही गुणविशेष लोकगीतांच्या मुळ प्रवृत्तीस परीपोषक ठरतात. लोकगीते ही लिखित असण्यापेक्षा ती जास्त मौखिकच दिसून येतात, व या गीताला गाणारी व्यक्ती स्वतःच्या शब्दाचाही वापर त्यात करते. त्यामुळे लोकगीतात नित्यनूतनता पहावयास मिळते.

वास्तविक तत्कालीन लोकगीते ही लोकभाषेतच प्रचलित असावी. पुराणाशिवाय इतर महाकाव्यामध्येही लोकगीतांच्या संदर्भात तसा उल्लेख सापडतो. डॉ. प्रभाकर मांडे यांनी आपल्या 'लोकसाहित्याचे स्वरूप' या ग्रंथामध्ये विंटर नीझच्या मताचा उल्लेख केलेला आहे. लोकगीतांचा उगम हा आदिम अवस्थेत जीवन जगणाऱ्या लोकांमध्ये झालेला असल्याने लोकभाषेतच ती अभिव्यक्त झाली असावीत असे म्हणता येईल.

लोकगीताने लोकजीवनाचा आणि समूह मनाचा आविष्कार केला. त्याबरोबर अनामिकाची निर्मितीही झाली. लोकगीताची जोपासणा ,जतन करण्याचे काम तसेच त्यात नवीन भर घालून पुढच्या पिढीला हा अनमोल ठेवा देण्याचे महत्त्वाचे कार्यही लोकजीवनातून केला गेला. लोकांनी समूह करून राहावयास सुरुवात करून सामूहिक जीवन सुरू झाले. तेव्हापासून लोकगीतांची परंपरा सुरू झाली. वैदिक काळात लोकगीते, विधीप्रसंगांची गीते गायली जात, याचे उल्लेख रामायण महाभारतात येतात . तेव्हा पुत्रजन्म, विवाहप्रसंग गीत म्हणण्याची प्रथा होती. यावरून लोकगीतांची परंपरा आपल्याला शोधता येते व ही परंपरा फार जुन्या काळापासून चालत आलेली आहे असेच म्हणावे लागेल.

आशय आणि अभिव्यक्ती या दृष्टीने लोकगीतांच्या परंपरेचे काही विशेष लक्षात येतात ते पुढील प्रमाणे..

- मौखिक परंपरेने चालत असलेली लोकगीते अनामिकाची असतात.
- लोकगीते गाता येतात. ती गेयपूर्ण असते. त्यांच्या चाली परंपरेने चालत आलेले असतात.
- लोकगीतात स्त्री गीतांची संख्या विपुल प्रमाणात आढळते.
- ओवीगीते स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण आहेत.
- लोकगीतात सतत परिवर्तन होत असले तरी मूळचा गाभा कायम असतो.
- लोकगीतातून लोकजीवनाचा आविष्कार झालेला असतो.
- लोकगीते कालातीत असतात.
- लोकगीते मंत्रात्मक असतात.
- लोकगीतात संबंध विधीशी असतो.
- 'लोकगीतात विविधता आढळते.
- लोकगीते नृत्य, नाट्य यांच्याशी अभिन्नपणे जोडलेली असतात.
- 'लोकगीत जीवनस्पर्शी असतात.
- लोकगीतातही संकेत आढळतात .
- 'रचनेच्या दृष्टीने लोकगीतात यमक साधलेले असतात.

■■■



Scanned with OKEN Scanner